ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)

REVIEW OF RESEARCH
VOLUME - 6 | ISSUE - 9 | JUNE - 2017

# सामाजिक न्यायासाठी लढा अटळ आहे

प्रकाश पवार
सहायक प्राध्यापक

**प्रस्तावना:**




स्वातंत्र्यपूर्व काळात परिवर्तनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये कायदा आणि समाजपरिवर्तन काही प्रमाणात हातात हात घालून जात होतेकायदा हे . समाजपरिवर्तनाचे माध्यम असू शकते आणि समाजात परिवर्तन होत असते त्या .काळात अधिकाधिक आधुनिक कायद्यांची मागणीही समाजातून पुढे येत असते न्याय निवडा करणे हे राज्याच्या काही मूलभूत कार्यापिंकी एक. कोणताही वाद निर्माण झाला तर न्यायालयामध्ये लोक जातात. न्यायालयात न्याय निवडा करत असताना, जे अधिकार व कर्तव्य पूर्वी पासून समाजात, राज्यात मान्य असतात, त्यानुसार निवडा दिला जातो. समजा एखाद्या समजामध्ये बहुपत्नीत्व ही समाजमान्य रीत असेल तर, नवऱ्याने दुसरं लग्न केल अशी तक्रार पत्नीला करता येत नाही. किंबहुना अनेक लग्न करणे हा नवऱ्याचा अधिकार असतो. म्हणून कायदा व धोरण ठरवत असताना राज्य कोणते निकष लावतात, कोणते मूल्य जपतात हे पाहणे गरजेचे असते. जिथे खाजगी संपती ठेवण्याचा अधिकार मान्य आहे, तेथे चोरी करणे हा गुन्हा ठरतो. एखाद्या व्यक्तीने किती संपती असावी, किती जमीन त्या व्यक्तीच्या मालकीची असावी हे कोण ठरवत? तर राज्याचे सामाजिक, राजकीय मूल्य काय आहेत यावर हे सर्व अवलंबून असते. सामंती समाज व्यवस्थेत खासगी संपत्ती बाळगणे, शेकडो-हजारो एक्कर जमीन बाळगणे चुकीचे नसून, तो ठराविक लोकांचा जन्मजात अधिकार मानला जातो. ज्या काळात अस्पृश्यता पाळणे धर्ममान्य आहे अशी राज्याची व धर्माची धारणा असते, तेव्हा अस्पृशते विरुद्ध न्यायालयात जाता येत नाही. एकूण काय तर अन्याय झाला आहे म्हणून दाद मागायला न्यायालयात जाता येते, परंतु कोणतेही न्यायालय जेवढे अधिकार व कर्तव्य राज्याने मान्य केले आहेत तेवढेच अधिकार बहाल करू शकतात. म्हणून कोणताही देश कोणत्या नीती व मुल्यांवर उभा आहे हे पाहणे गरजेचे असते.

कायद्याच्या माध्यमातून समाज परिवर्तन:

भारतामध्ये इंग्रजांचे राज्य प्रस्थापित होण्यापूर्वी धर्मशास्त्र हाच कायदा होता. १७७४ साली रेग्युलेटिंग कायदा मंजूर करून कंपनीने भारतात ताब्यात घेतलेल्या मुलुखाचा कारभार पाहण्याची जबाबदारी ब्रिटीश संसदेने प्रथमच आपल्या अंगावर घेतली. इंग्रजांच्या आमदनीत नंतर प्रगतिशील विचारांचे वारे भारतात वाहू लागले. फ्रेंच राज्य क्रांती मध्ये प्रस्तापित झालेले "समता, स्वतंत्र व बंधुभाव" हे मूल्य भारतामध्ये रुजू लागली. इंग्रज राजवटीमध्ये सर्व प्रथम कायद्याच्या माध्यमातून समाज सुधार - समाज परिवर्तन करण्याचे प्रयत्न

झाले. बालविवाह विरुद्धचा कायदा असो व सतीचा कायदा, हे कायदे समजामध्ये बदल आणण्याच्या हेतूने करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर आपण सुद्धा कायद्याच्या माध्यमातून समाज परिवर्तीत करण्यावर भर दिला.

विवाहविषयक कायद्यांमध्ये प्रामुख्याने कोण कोणाशी विवाह करू शकतो, विवाहाचे कायदेसंमत विधी कोणते असतात, विवाहातील दोन्ही जोडीदारांचे एका मर्यादेपर्यंत हक्क काय आहेत, कोणत्या कारणांनी विवाहाचे नाते संपुष्टात आणता येते, विवाह संपुष्टात आल्यावर पत्नी आणि मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी कोणावर आणि कोणत्या प्रकारचा विवाह बेकायदा आहे अशा ठळक मुद्द्यांचा विचार केलेला असतो.

**भारतातील समाज वास्तव व सामाजिक सामाजिक न्याया साठीचे प्रयत्न :**

सामाजिक न्यायाची संकल्पना समजून घेण्याआधी, भारतातील समाज वास्तव समजून घेणे गरजेचे आहे. भारतीय समाज जात व पितृसात्तेवर आधारित विषम समाज आहे. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात जाती व्यवस्था ही फक्त श्रमाची विभागणी नसून श्रमिकांची विभागणी देखील आहे. रोटी व बेटी व्यवहारावर बंधन हे जाती व्यवस्थेचे प्रमुख लक्षण आहे. जाती व्यवस्था श्रेणीबद्ध असमानतेवर अधिष्ठित आहे. वर्ण व जातिव्यवस्थेवर आधारलेल्या समाज व्यवस्थेमुळे या देशातील बहुजन समाज विद्या, सत्ता व संपत्ती पासून वंचित राहिला. हे वास्तव महात्मा जोतीराव फुले यांनी ओळखले. शूद्र, अतिशुद्र व स्त्रिया यांना विद्या व वित्त मिळण्याची विशेष संधी द्यावी असा आग्रह त्यांनी धरला. 'जातजातीच्या संक्या प्रमाणे कामे नेमा ती, खरी ही न्यायाची रीती' अशा शब्दात महात्मा फुलेंनी सामाजिक न्यायाचे उद्दिष्टे साधण्याचा एक मार्ग सांगितला. इंग्रज राज्यकर्ते सरकारी खात्यांमध्ये फक्त ब्राह्मण या एकाच जातीच्या लोकांची भरती करतात; त्यामुळे भटकामगारांची पेंढारगर्दी होते, असे फुले म्हणत. शूद्रातिशूद्र समाजाला विध्यार्जनाचा अधिकार ध्यावा, तसेच त्यांच्या संख्येच्या प्रमाणात अधिकारपदावर नेमणुका कराव्यात, असा आग्रह महात्मा फुल्यांनी आयुष्यभर धरला होता. इंग्रजी राजवटी मध्ये शूद्रांना प्रथम शिक्षणाची संधी जरी मिळाली असली तरी संधीची समानता असल्याखेरीज दारिद्र्यामुळे शुद्रतीशुद्रा मध्ये शिक्षणाचा प्रसार होणार नाही हे हि महात्मा फुलेंना माहित होते.

बहुजन समाजातील होतकरू गुणी तरुणांना शैक्षणिक पात्रतेस अनुरूप अधिकारपदांवर नेमण्यात सयाजीराव गायकवाड यांनी सुरुवात केली. सयाजीराव गायकवाड महाराजांनी आपले दिवान श्रीनिवासन अय्यंगार यांच्या रिकाम्या झालेल्या जागी महात्मा फुल्यांच्या काळातील सत्यशोधक समाजाचे सदस्य असलेल्या रामचंद्र विठोबा धामणसकर यांची दिवान म्हणून नेमणूक केली.

२६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानाच्या सरकारी नोकर्यामधील ५० टक्के पदे मागासवर्गीयान साठी राखून ठेवण्याबाबत अधिसूचना काढून शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाच्या दिशेने पहिले पाऊल उचलले. १९१२ साली शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. ज्या वयात मुलांनी शिकले पाहिजे, त्या वयात पालकांनी मुलांना शाळेत घातले पाहिजे. शेतीच्या कामात मुलांची मदत घेणे आवशक असल्यास जास्तीत जास्त १५ दिवस शाळेत न जाण्याची देलेली सुट सोडता इतर दिवशी मुले अकारण गैरहजर राहिल्यास प्राथम ताकीद, नंतर दोन आण्यापासून एक रुपयापर्यंत पालकांना दंड केला जात असे. शिक्षणाच्या हक्काचा कायदा स्वतंत्र भारतामध्ये २००९ साली अमलात आला, त्याच्या अगदी १०० वर्षानपूर्वी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थाना मध्ये हा कायदा आणला होता. बहुजन समाजाच्या मागासलेपणास शिक्षणाचा अभाव कारणीभूत असल्याचे ओळखत, कोल्हापूर संस्थानामध्ये मागास जाती- जमातीसाठी शाळा काढण्यास प्रोत्सान दिले, वसतीगृह काढली, मांग, महार, नामदेव शिंपी आदी जातीतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची सोय केली. मैसूर संस्थाना मध्ये १९१९ च्या जुलै महिन्यात मागासवर्गीयांना ५०% राखीव ठेवण्याची शिफारस सर लेस्ली मिलर समितीने मैसूर च्या महाराजांना केली होती. हा अहवाल १६ मे १९२१ रोजी महाराजांनी स्वीकारली व १९२१ नंतर असते असते ७ वर्ष आरक्षणाचे धोरण मैसूर संस्थानात अमलात आले.

बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायची पायाभरणी स्वातंत्रपूर्व काळापासूनच केली. महाडचा चवदारतळ्याचा सत्याग्रह, नासिक च्या काळाराम मंदिराचा सत्याग्रह, दलितांसाठी विभक्त मतदारसंघाची मागणी, खोतीचे आंदोलन डॉ आंबेडकरांच्या नेतृत्वा खाली झाली. १९४२ ते १९४६ बाबासाहेब मजूर मंत्री होते. या काळात त्यांनी मजुरांसाठी अनेक सुधारणा घडवून आणल्या. मजुरांचे प्रश्न

सोडविण्याकरिता सरकार, कामगार संघटना आणि मालक यांची त्रिपक्षीय मंडळ याच कालावधीत नावारूपास आले. खाणीत काम करणाऱ्या स्त्रियांना बाळंतपणाची रजा व तीही पगारी मिळण्याची सोय करणारे विधेयक त्यांनी संमत करून घेतले होते. कामगार विमा योजनेचा पाया त्यांनी रचला. स्त्रियांना पुरुषां इतकीच मजुरी देणारा आदेश त्यांनी काढला. फॅक्टरी ॲक्ट मध्ये दुरुस्ती करून मजुरांना सात दिवस पगारी रजेची सोय करण्यात आली. मजुरांचा दहा तासांचा दिवस कमी करून आठ तासांचा दिवस करणारे विधायक त्यांनी पारित केले.

### सामाजिक न्यायाची संकल्पना:

सामाजिक न्यायाची संकल्पना ही राजकीय न्यायाच्या संकल्पनेचाच एक भाग आहे. समते वर आधारित समाज व्यवस्था निर्माण करणे हे सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत अंतर्भूत आहे. प्रत्येकाला समान संधी, संसाधनाचे न्याय वाटप प्रत्येकाला अभिव्यक्त होण्याचे स्वातंत्र्य. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत जे दुर्बल आहेत त्यांना विकासाची विशेष तरतूद करणे व त्यांना समान पातळीवर आणून ठेवणे अंतर्भूत असते. 'समता' ही काही गणिती संकल्पना नसून ती सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक संकल्पना सुद्धा आहे. म्हणून फक्त सर्व लोक समान आहेत म्हणून भागत नाही तर, जे वंचित आहेत, परीघा बाहेर आहेत त्यांच्यासाठी विशेष तरतुदी करणे, त्यांना विकासाची विशेष संधी निर्माण करणे आवशक असते.

### राज्य घटना व सामाजिक न्याय:

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये एकीकडे राजकीय स्वातंत्र्याचे आंदोलन चालू होते तेव्हा सामाजिक सुधारणांचे व आर्थिक बदलांचे आंदोलन सुद्धा समांतररीत्या चालू होते. मंदिर प्रवेशाचे आंदोलन, अस्पृश्यते विरुद्धचे आंदोलन, खोतीचे आंदोलन, चंपारणचे शेतकऱ्यांचे आंदोलन, स्त्रियांच्या अधिकारांचे आंदोलन, अशी अनेक आंदोलने व चळवळी स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये चालू होत्या. या सर्व आंदोलनाचा प्रभाव राज्य घटना निर्मितीवर झाला आहे. भारतीय राज्यघटनेचा सरनामा एका नव्या समाजाचे चित्र रेखांकित करतो. संविधानाची उद्देशिका १३ डिसेंबर १९४६ रोजी पंडित नेहरू यांनी संविधान सभेत मांडलेल्या ठरावावर आधारलेली आहे. सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार, अभिव्यक्ती, उपासना, व्यवसायाचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता या उद्दिष्टांचा उद्‌घोष राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत आहे. भारतीय राज्यघटनेने समतेचा मूलभूत अधिकार कलम १४, १५, १६ व १७ मध्ये अधोरेखित केला आहे. मूलभूत अधिकारांच्या जाहीरनाम्यात कायद्यापुढे सर्व समान आहेत व धर्म, जात, लिंग, वंश या कारणावरून कोणाही विरुद्ध पक्षपात केला जाणार नाही हे महत्वाचे कलम राज्यघटनेत आहे. परंतु ज्या समाजात विषमतेची परंपरा होते त्या समाजात केवळ कायद्याने समानता आणून भागत नाही. ज्या समूहांना पूर्वीच्या व्यवस्थेत हजारो वर्षे शिक्षणास व समान संधीस वंचित करण्यात आले होते त्यांना विशेष संधी देणे आवश्यक होते व ही तजवीज सुद्धा राज्यघटनेत आहे. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठी विशेष तरतुदी करण्याची जबाबदारी शासनावर टाकण्यात आली आहे. सरकारी नोकऱ्यांच्या बाबतीत राखीव जागांची तरतूद करण्यात आली. कलम ३८ प्रमाणे शासनाने लोकांच्या हिताचे संवर्धन करावे आणि सामाजिक व आर्थिक न्यायावर आधारित समाजरचना प्रस्थापित करावी असा आदेश राज्यघटना देते. अस्पृश्यतेची प्रथा जरी धर्मशास्त्र मान्य असली तरी कलम १७ प्रमाणे अस्पृश्यता नष्ट करण्यात आलेली आहे, व अस्पृश्यतेचे पालन करणे हा गुन्हा आहे. वेठबिगारी व बालकामगार या प्रथांना प्रतिबंध करणारी कलम २३ व कलम २४ राज्यघटनेत आहेत, तसेच अल्पसंख्याकांचे सांस्कृतिक व शैक्षणिक मूलभूत अधिकार कलम २९ व कलम ३० मध्ये अधोरेखित केले आहेत. राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये ३९ व्या कलमात अर्थव्यवस्थेतून संपत्तीचे केंद्रीकरण मूठभर लोकांच्या हाती होऊ नये आणि उत्पादनाची साधने समाजाच्या हिताच्या विरोधी वापरली जाऊ नये त्याकरिता शासनाने प्रयत्न करावेत असे सांगितले आहे.

स्वातंत्र्य भेटल्यानंतर राज्यघटनेचा अंमल सुरु झाला व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याची संविधानिक जबाबदारी सरकारवरती येऊन पडली. आता सामाजिक न्याय फक्त नैतिक मागणी ना राहता जनतेचा संविधानिक अधिकार झाला आहे. सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणी साठी अनेक कार्यक्रम हाती घेतले गेली. देशभरामध्ये झालेले भूमी सुधार कायदे सामाजिक न्यायाच्या

कार्यक्रमाचाच एक भाग होता. सरकारने जमीनदारांच्या जमिनी काढून घेतल्या व त्या जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना वाटून दिल्या. जनतेला सावकारीतून वाचवण्यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण हा सुद्धा सामाजिक न्यायाच्या कार्यक्रमाचाच भाग होता. वेठबिगारी नष्ट करणारा कायदा, बालकामगारांवर बंदी घालणारा कायदा, अस्पृश्यता निवारणाचा कायदा, देवदासी प्रथा नष्ट करण्याचा कायदा, मंदिर प्रवेशाचा कायदा, स्त्रियांना वडिलोपार्जित संपत्ती मध्ये समान हक्क देणारा कायदा, शिक्षण हक्काचा कायदा असे अनेक कायदेशीर बदल स्वातंत्र्योत्तर काळात घडले. मागासवर्गीय समाजाला शिक्षणात, नौकरी मध्ये आरक्षण. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती सामाजिक न्यायाच्या कार्यक्रमाचा भाग आहे.

**सध्य परिस्थिती:**

१९९० ला देशाची अर्थ व्यवस्था खुली करण्यात आली. अनेक सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण करण्यात आले. देशामध्ये मोठ्या प्रमाणात विदेशी भांडवल गुंतवण्यात आले. व मग गुंतवणूक करणाऱ्या भांडवलदारांच्या मर्जीने कायदे व धोरण ही बदलू लागले. शिक्षणाचे खाजगीकरण झाले व दर्जेदार शिक्षण सामान्य लोकांच्या आवाक्या बाहेर गेले. राज्य हे कल्याणकारी राज्य न राहता फक्त मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यापुर्तेच मर्यादित राहिले. कामगार कायद्या मध्ये भांडवलदारांच्या सोयीनुसार बदल करण्यात आले. देशाचा विकासदर काही काळ वाढला जरूर परंतु गरीब व श्रीमंतातील दरी सुद्धा कधी नव्हती तेवडी वाढतच गेली. रोजगार सर्वेक्षण २०११-१२ नुसार, एकंदर कामगार वर्गापैकी २५ टक्के हे बिगर शेती नियमित कामगार आहेत. त्यापैकि ५७ टक्के कामगारांना नोकरीची हमी नाही किंवा सामाजिक सुरक्षा नाही. अशा बहुतेक कामगारांना 'उद्यापासून ये' काहीही लिखापडी न करता एवढेच सांगितले जाते. असंघटित आणि नियमित नौकरीवरती न घेण्यात आलेल्या कामगारांचे प्रमाण खासगी क्षेत्रात ७१ टक्के आहे. शिक्षणाचा अभाव, हे असंघटित क्षेत्रातील नौकरीकडे ढकलल्या जाण्याचे प्रमुख कारण आहे. कमी शिक्षण, प्रशिक्षणाचा अभाव असल्यामुळे ह्या कामगारांचे मासिक उत्पन्न सुद्धा कमीच असते.

दलित व आदिवासी यांच्या वरती त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पामध्ये रक्कम ठेवण्याचा प्रघात वर्षानुवर्षे चालू असतानाही दलित व आदिवासी यांचा म्हणावा तेवढा विकास मागील ७० वर्षांमध्ये झालेला दिसत नाही. गरीबी, कुपोषण, कमी शिक्षण, नागरी सुविधांचा अभाव या गोष्टी वर्षानुवर्षे तशाच आहेत . भूमिसुधार कायदानुसार कसणाऱ्याला जमीन मिळाली परंतु जे भूमिहीन होते त्यांना काही सुद्धा मिळाले नाही. हरितक्रांती, धवल क्रांती, सहकार यामुळे जे शेतकरी जाती होत्या ते विविध राज्यांमध्ये राज्यकर्ते म्हणून उदयास आले. परंतु जे भूमिहीन होते अल्पभूधारक होते ते अजूनही परीघावरतीच आहे. आदिवासींचे जंगल, जमीन व संस्कृती विकासाच्या नवीन प्रारूपामध्ये पूर्णपणे उध्वस्त होत आहेत. सरकार आदिवासींची जमीन व जंगल स्वत: अधिग्रहण करून भांडवलदारांना देत आहेत.

**बाबासाहेबांचा इशारा:**

घटना समितीमध्ये दिनांक 25 नोव्हेंबर 1949 रोजी बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले भाषण याची नोंद घेणे आज जास्त गरजेचे वाटत आहे. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात निव्वळ राजकीय लोकशाहीवर समाधान न मानता ही लोकशाही सामाजिक व आर्थिक लोकशाही कशी होईल यासाठी प्रयत्न केला पाहिजे. या भाषणात बाबासाहेब एक धोक्याचा इशारा राज्यकर्त्यांना व देशाला देतात. "26 जानेवारी 1950 रोजी राजकीय जीवनात समता येईल, परंतु सामाजिक व आर्थिक जीवनात विषमता राहील. ही विसंगती जर आपण लवकर दूर केली नाही तर आपण हा महाप्रयत्नाने बांधलेला राजकीय इमला विषमतेची झळ पोचलेला वर्ग उद्ध्वस्त केल्यावाचून राहणार नाही."

बाबासाहेबांचा हा इशारा आपण विसरता कामा नये. फक्त निवडणुका पार पडणे म्हणजे लोकशाही नव्हे. सामाजिक व आर्थिक विषमता दूर करून सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करणे म्हणजे लोकशाही प्रस्थापित करणे होय सामाजिक न्याय प्रस्थापित

करणे ही निकोप लोकशाहीची एक पूर्व अट आहे. जो पर्यंत आपण सामाजिक समता प्रस्थापित करत नाही तो पर्यंत लोकशाही फक्त निवडणुकी पूर्तिच मर्यादित राहील.

समाजाच्या सांस्कृतिक व्यवस्थेत सारखा बदल होत असल्याने सामाजिक परिवर्तन चालू राहतेएका पिढीतील मूल्ये पुढच्या . मातापित्यांना ज्या गोष्टी आवडतात .पिढीतील लोकांना मान्य होत नाहीत, त्या मुलांना आवडतीलच असे नाहीकुटुंबपद्धती .,विविध सण–उत्सव साजरे करण्याच्या पद्धती यांत बदल होतातमानवाच्या प्राथमिक अवस्थेत नर .–मादी एवढेच संबंध होतेत्यातून स्वैराचार घडत . ज्वालामुखीचा उद्रेक .ची निर्मिती झालीकुटुंबात संस्कृती .त्यानंतर विवाहसंस्था आली .असे, रोगराई,प्रचंड पूर अगर वादळ, उष्णतामान, पर्जन्यमान, हिमयुगाची सुरू वात किंवा अस्त, नदीप्रवाह बदलणे या नैसर्गिक घडामोडींमुळेही सामाजिक परिवर्तन होतेया आकस्मिक . जैविक परिस्थितीतील आनुवंशिकतेच्या व .लागतात बदलांना अनुरूप असे बदल मानवाला आपल्या सामाजिक जीवनात करावे संकराच्या तत्त्वांमुळे सामाजिक परिवर्तन ह ोतेजननप्रमाण आणि मृत्यूप्रमाण या दोन्ही गोष्टींवर नियंत्रण ठेवता आल्याने समाजाच्या . .लोकसंख्येच्या रचनेत बदल होत जातो आणि याचा प्रभाव सामाजिक परिवर्तनावर पडतो

*** संदर्भ ग्रंथ***

१. तेलतुंबडे आनंद , सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण ,' लोकवांडमय ,मुंबई - तिसरी आवृत्ती २०१४
२. थोरात सी. पी. , ' पुणे करार -करार नाही तर तह, काय कमावले आणि काय गमावले, सुमेध प्रकाशन पुणे २००७
३. थोरात सुखदेव, ' खाजगी क्षेत्रातील आरक्षण विषयक वाद चर्चा', सुगावा प्रकाशन , पुणे प्रथमावृती २०१५
४. फडके य.दि.,' राखीव जागांची शंभर वर्ष', सुगावा प्रकाशन, पुणे- प्रथम आवृत्ती- १९८५
५. बसू दुर्गा दास, ' भारतीय राज्य घटनेची ओळख (मराठी अनुवाद) लेक्सिस नेक्सिस गुडगाव , हरियाणा -दुसरी आवृत्ती २०१६
६. लद्दा उंटवाला वर्षा (संकलन) आरक्षण धोरण , डॉ. बाबसाहेब आंबेडकर सशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे -प्रथमावृती २०१६
७. परिवर्तनाचा वाटसरू पाक्षिक ' वेध आंबेडकरी विचार व्यवहार ,संपादक अभयकांता, १६ ते ३१ मार्च २०१६